# प्रकरण सहावे

# उपसंहार

# प्रकरण सहावे

# उपसंहार

स्त्रीवादी साहित्य ही संकल्पना गेल्या तीन साडेतीन दशकातील आहे. मराठीत तर गेल्या दशक ते दीड दशकातील आहे. मराठीत तर गेल्या दशक ते दीड दशकातच स्त्री साहित्यासंबंधी बोलले जाऊ लागले आहे. विशेषत: १९७५ ते १९८५ या आंतरराष्ट्रीय महिला दशकातच स्त्रियांच्या अस्मिता जागृतीसंबंधी जे संघटित प्रयत्न झाले. त्याच्या प्रत्यक्ष प्रभावातून स्त्रियांच्या साहित्यातून नव्या जाणिवा व्यक्त होऊ लागल्या आणि त्या काळातील स्त्रियांच्या लेखनातून स्त्रीवादी जाणिवा प्रकर्षाने आढळतात. म्हणून त्यांच्या साहित्याला स्त्रीवादी साहित्य असे म्हटले जाऊ लागले. त्याचबरोबर स्त्रीत्वाचा शोध घेणारे व पुरुषी मूल्य नाकारणारे साहित्य हेच स्त्रीवादी साहित्य ठरु शकेल. केवळ स्त्रीविशिष्ट अनुभव मांडणे म्हणजे स्त्रीवादी साहित्य नव्हे तर पुरुषसत्ताक चौकटीतून मुक्त होऊन स्त्रीवादांच्या अस्मितेचा अनुभव संघटित करणे हे ध्येय ठेऊन लिहिलेले साहित्य हेच स्त्रीवादी साहित्य ठरेल. या साहित्याची स्त्रीवादी दृष्टिकोणातून मीमांसा करताना स्त्रीला स्त्रीत्वाविषयी आलेले आत्मभान ही बाब अत्यंत महत्त्वाची मानावी लागते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्त्रियांनी केलेले कादंबरी व कथालेखन हे बहुतांशी स्त्रीवादी दृष्टिकोणातून केलेले आहे. म्हणून येथे स्त्रीवादी लेखिका म्हणून आजच्या आघाडीच्या कथालेखिका उर्मिला पवार आहेत. त्यांच्या कथालेखनाचा स्त्रीवादी दृष्टिकोणातून आतापर्यंत सखोलपणे आणि सर्वांगीण विचार झालेला दिसून येत नाही. म्हणून त्यांच्या कथालेखनाचा अभ्यास येथे अभिप्रेत आहे.

स्त्रीवादी दृष्टिकोणातून स्त्रियांच्या कथालेखनाचा विचार करता स्वातंत्र्यानंतर जवळपास १२० कथासंग्रह स्त्रियांनी लिहिलेले दिसून येतात. या स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडामध्ये कथालेखन करणा-या स्त्री लेखिकांमध्ये उर्मिला पवार या अलिकडच्या काळात वाचकाचे लक्ष वेधून घेणा-या, प्रगल्भ अशी जीवनदृष्टी असलेल्या आणि कसदार लेखन करणा-या आघाडीच्या स्त्रीवादी लेखिका म्हणून त्यांचा उल्लेख करता येईल. म्हणूनच त्यांच्या 'सहावं बोट' (१९८८) आणि 'हातचा १' (२००४) हे त्यांचे सर्व दृष्टीने आणि विशेषत: स्त्रियांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने स्त्री विश्वाचा आणि स्त्रियांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने स्त्री विश्वाचा आणि स्त्रियांच्या मानसिकतेचा सखोल वेध घेणारे असे दोन कथासंग्रह आहेत. विशेषत: महानगरामध्ये नोकरी करणा-या स्त्रीच्या अनेकविध समास्या आणि या अनुषंगाने स्त्रीच्या भावविश्वाचे अनेकविध पदर त्यांच्या कथातून प्रभावीपणे व्यक्त होतात.

'सहावं बोट' (१९८८) आणि 'हातचा १'(२००४) या दोन्ही कथासंग्रहात उर्मिला पवार यांनी महानगरातील उच्चशिक्षित स्त्री नोकरी करुन स्वावलंबी जीवन जगणारी, आपल्या भविष्याचा विचार करणारी, पुरुषी वर्चस्व अमान्य करणारी, स्त्री-पुरुष समानतेचा विचार करणारी आणि कुटुंबातील नातेसंबंधाचे आणि या नातेसंबंधात ती स्त्री स्वत:चे अस्तित्व शोधते आणि या अस्तित्व शोधामध्ये तिला कुटुंबापेक्षा कधी कधी एकाकी जीवनाचा हव्यास वाटतो आणि त्याचबरोबर विवाह संस्थेविषयीचा तिच्या मनात भ्रमनिरास होतो अशी ही महानगरामध्ये नोकरी करुन जगणारी स्त्री तिच्या समस्या आणि या समस्यांतून स्त्री म्हणून तिची तयार झालेली मानसिकता यांचा सखोल वेध घेणा-या अशा त्यांच्या कथा आहेत. म्हणून वरील दोन कथासंग्रहांचा संशोधनासाठी

प्रामुख्याने विचार केलेला आहे. त्याचबरोबर स्त्रीमुक्ती, समता, प्रतिष्ठा आणि कामवासना इ. विषयातच घुटमळत न राहता त्यापुढे जाऊन उर्मिला पवार आपल्या कथांतून बिनधास्तपणे आणि बिनदिक्कतपणे स्त्री-पुरुष संबंध आणि लैंगिक अनुभवाचे चित्रण करतात आणि महानगरीय संवेदनाशी नाते जोडत स्त्रियांच्या समकालीन समस्यांचा त्या वेध घेतात. आजच्या समकालीन जीवनात महानगरीय स्त्रीच्या समस्या या तिच्या अस्तित्वाशी निगडीत आहेत ही जाणिवही त्यांच्या कथातून कशाप्रकारे अभिव्यक्त झालेली आहे ? याचाही वेध येथे घेण्याचे ठरविले आहे आणि स्त्रीजीवनाचा नवा अन्वयार्थ शोधू पाहणा-या अशा उर्मिला पवार यांच्या कथा आहेत. याचबरोबर त्यांच्या कथातून व्यक्त होणारे स्त्रियांचे भावविश्व, त्यांच्या समस्या, रुढी-परंपरा, सांकेतिक व्यवहार, लैंगिकता इ. प्रश्नांचा विचारही येथे अभिप्रेत आहे. त्याचबरोबर स्त्रीवादी दृष्टिकोणातून या दोन्ही कथासंग्रहाचे आशयविश्व आणि अभिव्यक्ती विशेष नेमके कोणते आहेत ? तसेच महानगरीय स्त्री जीवनाचा वेध घेताना स्त्री समस्यांच सर्वांगिण चित्रण केले जाते का ? स्त्रीच भावविश्व आणि या भावविश्वाचे एकूण कुटुंब विश्वाशी आणि समजाविश्वाशी असलेला त्यांचा नेमका अनुबंध कोणता ? माणसांच असणं आणि होणं, भूत आणि वर्तमान, एक आणि दुसरा यांच्यातून तुटत जाणे आणि जोडल जाणे ही महानगरीय जीवनाची खास नजाकत त्यांच्या कथांतून कशी साकार होते ? तसेच उर्मिला पवार कथालेखिका म्हणून मराठी कथा विश्वाला त्यांचे लाभलेले योगदान नेमके कोणत्या स्वरुपाचे आहे ? इ. प्रश्नांचा शोध येथे घ्यावयाचा आहे. तसेच उर्मिला पवार यांच्या कथालेखनाच्या विशेषाबरोबर जाणवणा-या मर्यादा यांचाही शोध येथे अभिप्रेत आहे.

'स्त्रीवादी साहित्य संकल्पना आणि स्वरूप' या पहिल्या. प्रकरणात स्त्रीवाद म्हणजे काय ? ह्याचे विवेचन करून तद्नंतर स्त्रीवादाच्या अनुषंगाने झालेल्या चळवळीचा विचार थोडक्यात मांडून स्त्रीवादाचा प्रारंभ कुठे व कसा झाला ? भारतीय स्त्रीवादाची वाटचाल, स्त्रीवादी साहित्याची माहिती घेऊन त्यावरील मान्यवर अभ्यासकांची मते लक्षात घेतली. स्त्रीवादी साहित्यातील विविध पंथामध्ये मवाळ स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद, मूलतत्त्ववादी स्त्रीवाद, पर्यावरणवादी स्त्रीवाद, ब्रिटिश स्त्रीवाद, फ्रेंच स्त्रीवाद इ. स्त्रीवादाची थोडक्यात माहिती घेऊन तसेच स्त्रीवादी साहित्याची समीधा कशी करता येईल यातून स्त्रीवादी साहित्य त्यातील पंथ, समीक्षाविषयक अभ्यासकाचे दृष्टिकोन याआधारे स्त्रीवादी साहित्यसंकलपना व स्वरूप लक्षात घेतले.

'स्त्रियांच्या कथालेखनाचे स्वरूप आणि विशेष' या दुसऱ्या प्रकरणात स्त्रियांच्या कथालेखनाचे स्वरूप लक्षात घेता स्त्रीच्या दास्यमुक्तीच्या दिशांची वैचारिक मांडणी, विवाह संस्थेविषयीचा स्त्रिनिष्ठ अनुभवाचे चित्रण, स्त्रियांच्या आत्महत्या व जळितप्रकरणे, ढासळत्या कुटुंब व्यवस्थेतील स्त्रीचे स्थान, नोकरी व्यवसायाच्या ठिकाणी येणारे स्त्री अनुभव तसेच स्त्री अनुभवातील शरीरविशिष्टता इ. स्त्रीजीवनाच्या विविधांगांचे चित्रण करणाऱ्या कथा अनेक लेखिकांना लिहिलेल्या आहेत. त्याचबरोबर त्यांच्या कथालेखनाच्या स्वरूपाबरोबर त्यांच्या कथांच्याा अभिव्यक्तीचा विचार केला. स्वातंत्रपूर्व काळात आणि स्वातंत्र्योतर काळातील ज्या स्त्रीकथाकारांनी योगदान दिले त्यांच्याही काही उल्लेखनीय कथांचा विचार केला. या सर्व विवेचनावरून स्त्रियांच्या कथालेखनाचे स्वरूप, विशेष वाटचाल लक्षात घेतली.

'सहावं बोट' आणि 'हातचा १' या कथा संग्रहातील आशयसुत्रे या प्रकरणात उर्मिला पवार यांच्या कथेतील आशयसूत्राचा विचार करण्यापूर्वी लेखिकेच्या जीवनाचा व त्यांच्या साहित्याचा, त्यांच्या कथालेखनामागील प्रेरणांचा विचार केला. इेखिकेने स्त्रियांच्या समस्या त्यांच्या वेदना मांडण्याचा यशस्वी प्रयत्न 'सहावं बोट' आणि 'हातचा १' या कथासंग्रहातून केला आहे. त्यांच्या कथांतील आशयसूत्राचा विचार करता स्त्रियावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे चित्रण करणाऱ्या कथा, नवऱ्याच्या संशयी स्वभावाला बळी पडलेल्या स्त्रिया, विधवा स्त्रियांची दुःखे, अविवाहित तरूणींची दुःखे, आंबेडकरी विचारधारा व्यक्त करणाऱ्या कथा इ. आशयसूत्रे आढळतात. त्यांच्या प्रत्येक कथेमधून आपणास एक नवा बोध मिळतो. उर्मिला पवार यांनी मालदवी, हिंदी, इंग्रजी या भाषेचा वापर पात्रांच्या तोंडी अगदी व्यवस्थित केला आहे. त्यामुळे त्यांच्या कथेतील आशयाला जिवंतपणा प्रापत होतो.

'सहिावं बोट' आणि 'हातचा १' या कथासंग्रहातील 'अभिव्यक्ती विशेष' या चौथ्या प्रकरणात वरील कथासंग्रहातील कथांचे अभिव्यक्ती विशेषांचा विचार त्यांच्या कथांची कथानक रचना, व्यक्तिचित्रण, प्रसंगचित्रण, निसर्गचित्रण, वातावरणनिर्मिती, निवेदनपद्धती, संवाद, भाषाशैली या घटकांच्या आधारे केलेला आहे. कथानक रचनेत फडक्याच्या तंत्राचा वापर, व्यक्तिचित्रणामध्ये नायक-नायिका सामाजिक भान राखणाऱ्या तंत्राचा वापर, व्यक्तिचित्रणामध्ये नायक-नायिका सामाजिक भान राखणाऱ्या आहेत. प्रेम, माया, मानवता यांचा प्रसंगचित्रणात वापर केलेला दिसून येतो. तर पात्रांच्या मानसिकतेला अनुसरुन कथांतून वातावरणा निर्मिती साधली आहे. निवेदनपद्धती

ओघवती अशीच आहे. त्याचबरोबर मनाची पकड घेणारे सहज,साधे, सोपे संवाद कथेत येतात. भाषाशैली साधी, सोपी व रोखठोक आहे.

'उर्मिला पवार यांच्या कथालेखनाचे विशेष आणि मर्यादा' या प्रकरणात एकंदर मराठी कथेच्या प्रांतात उर्मिला पवारांनी घातलेली भर अतिशय महत्त्वाची आणि मोलाची आहे. दलित व दलितेतर स्त्रीचा हा स्वत्व शोध चळवळीचा व साहित्याचा परिघ समृद्ध होण्यास पोषक ठरेल असाच आहे. ज्वलंत अनुभवाबरोबरच कल्पना आणि प्रतिभासामर्थ्याचे सजलेल्या या कथांची दखल साहित्यिकांनी घ्यावी.

'उपसंहार' या प्रकरणात प्रकरण १ ते ५ मधील सारांश सांगून शेवटी अभ्यासाचे निष्कर्ष मांडले आहेत.

**निष्कर्ष :**

१) उर्मिला पवार यांच्या सहावं बोट आणि हातचा १ या दोन्ही कथासंग्रहांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, स्त्रीचं आणि दलित स्त्रीचं चित्रण आजवरच्या अनेक कथांमधून, आत्मकथनांमधून आलेलं आहे. परंतु उर्मिला पवार यांनी चित्रित केलेली स्त्री, तिच्या यातना, संताप अधिक ज्वलंत आणि भोंगळ स्वकीयांची चिरफाड करणारा आहे. स्त्रीचा हा स्वत्व शोध, चळवळीचा आणि साहित्याचा परिघ समृध्द होण्यास पोषक ठरेल असाच आहे. ज्वलंत अनुभवाबरोबरच कल्पना आणि प्रतिभा सामर्थ्यांने सजलेल्या त्यांच्या कथा आहेत.

२) 'सहावं बोट' आणि 'हातचा १' या दोन्ही कथासंग्रहांमध्ये प्रामुख्याने स्त्रीप्रधान व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत. परंतु त्यांनी काही कथांमध्ये पुरुष व्यक्तिरेखाही इतक्या प्रभावीपणे रेखाटल्या आहेत की, ते वर्णन स्त्रीने केलेली आहे असे वाटतच नाही.

उर्मिला पवारांचा 'सहावं बोट' हा पहिला कथासंग्रह प्राधान्याने स्त्रीमनाची स्पंदने टिपणारा तेरा कथांचा संग्रह आहे. तर 'हातचा १' हा चौदा कथांचा संग्रह असला तरी साहित्यिक मूल्यांच्या बाबतीत तो उच्च दर्जाचा आहे. 'सहावं बोट' या संग्रहातील कथांपेक्षा 'हातचा १' मधील कथेचं विकसित रूप पाहायला मिळतं.

३) उर्मिला पवारांच्या कथांचा आढावा घेता असे दिसते की, त्यांनी स्त्री, दलित स्त्री व दलित वर्ग यांच्या समस्या परखडपणे मांडल्या आहेत. त्यांच्या कथेतील स्त्री अनेक वेळा वेगवेगळी भूमिका बजावताना दिसते. ती कधी आई, बहीण, सून, सासू, पत्नी, मुलगी असते. या प्रत्येक भूमिकेतील स्त्रीला समाजात व कुटुंबात वेगवेगळी प्रतिष्ठा, मान असतो. त्यांची कर्तव्येही वेगवेगळी असतात. त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोणही वेगवेगळा असतो आणि हेच वेगळेपणं दाखविण्याचे काम लेखिका समर्थपणे आणि परखडपणे करतात. हे सगळे वर्णन करताना त्यांची शैली कोठेही अडखळताना दिसत नाही किंवा शब्दांचा तुटवडा पडताना दिसत नाही.

४) स्त्री तिचे बाह्यविश्व, तिचे अंतर्विश्व यांच्यातील परस्परसंबंध, त्यातील गुंतागुंत, तिच्या कुटुंबातील माणसांची मन यांचा शोध खोलवर जाऊन

घ्यावा. स्त्री मनाचे पदर न पदर उलगडून दाखविण्यात त्या रंगून जातात. तर कधी स्त्रीच्या मनातील निरनिराळ्या कारणांनी निर्माण होणा-या ताणतणावाचे त्या सहज दर्शन घडवितात उदा. 'हातचा १' या कथेमधील रजनी तिच्या मनाची तगमग, सगळ्यात राहूनही आपण एकटेच ही भावना निर्माण झलेली आहे.

उर्मिला पवारांची कथा घरात, बाजारात, रेल्वेत, ऑफीसमध्ये घडते. त्यांच्या कथेतील स्त्री दलित तसेच सवर्णही आहे. ती शहरी आणि ग्रामीणही आहे. ती सुशिक्षित तसेच अशिक्षितही आहे. पारंपरिकता जोपासणा-या स्त्री बरोबर स्वातंत्र्याचे आत्मभान येणारी स्त्री ही त्यांनी रेखटली आहे. पुरुषी सत्येपुढे अगतिक झालेली, (सहावं बोट, प्लॅस्टिकचा कान) आणि प्रसंगी पुरुषांन धडा शिकविणारी स्त्री सुध्दा त्यांच्या कथेत आहे. (हातचा १) स्वत:चे अस्तित्व सांभाळणारी स्त्रीसुध्दा त्यांनी रेखाटली आहे.

५) त्यांच्या कथेतील स्त्रियांच्या मनातील दु:ख, आक्रोश, चीड, प्रेम, वात्सल्य आपणांस दिसते व अन्यायामुळे, शोषणामुळे धगधगते मनही दिसते जे वाट्याला येईल ते भोगणारी, येणा-या जीवनानुभवाचा स्वीकार करण्याची क्षमता व आत्मविश्वास त्यांच्या कथेतील स्त्रेत आहे. तसेच आपल्या वाटेला आलेल्या स्थानाचा, भूमिकेचा गंभीरपणे विचार करणा-या स्त्रियाही त्यांच्या कथेत आपल्याला भेटतात.

६) उर्मिला पवारांच्या कथेत अनुभवांचा जिवंत आविष्कार, तत्कालीन भावनांची स्पंदने आलेली आहेत. तसेच वेगवेगळ्या घटना प्रसंगाच्या

निमित्ताने चालणारे माणसाच्या मनाचे सूक्ष्म चलनवलन, त्यातील परस्पर विरोध, त्यातून उत्पन्न होणारे भावनिक ताण, त्या ताणांमुळे येणारी बधिरता किंवा ताण ओसरल्यावर लाभणारी स्वस्थता सारखी जाणवत राहतेृ भावनिक ताणांची प्रदीर्घ सोबत स्त्रीला अनेकदा आक्रसून टाकते आणि तसे घडू नये यासाठी तिला त्यातून प्रयत्नपूर्वक बाहेर पडावे लागते.

७) उर्मिला पवारांच्या कथेतील व्यक्तिरेखा नंतर बदलत गेल्या. त्यांची स्त्री दिवसेंदिवस विचारी, धाडसी, सुशिक्षित आणि पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारी आहे. ती अनेक क्षेत्रात भाग घ्यायला लागली. आंबेडकरी विचारांचा आणि स्त्रीमुक्ती संघटनेचा दबाव तिच्यावर पडलेला दिसतो. उदा. आये मधील आये ही शहर सोडून खेड्यात रहायला जायला तयार नाही तिला आंबेडकरांनी सांगितलेला उपदेश आठवतो. खेडी सोडा, शहरात जा.

८) उर्मिला पवारांच्या कथांमध्ये एक गोष्ट विशेषत्वाने जाणवते ती म्हणजे त्यांनी आपल्या कथांमध्ये निसर्गवर्णनाला मोजकेच स्थान दिले आहे. कारण त्यांच्या कथेतील पात्रांची वेदनाच वेगळी आहे. उर्मिला पवारांच्या कथा आणि त्यांचे जीवन चरित्र पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, त्यांच्यातील परिवर्तनाबरोबरच त्यांच्या कथेतील स्त्रीची जडणघडण होत गेलेली आहे.

एक स्त्री या भूमिकेतून एखाद्या अनुभवाकडे पाहण्याची, तो घेण्याची व तो व्यक्त करण्याची स्त्रीची पध्दत पुरुषापेक्षा वेगळी असण्याची शक्यता, शिवाय बदलत्या काळानुसार स्त्री जीवनाचे य्पही

बदलले आहे. जेव्हा स्वयंपाकघ्रातून दिवानखान्यात येण्याइतकी अथवा कारणपरत्वे बाहेरच्या जगामध्ये पाऊल ठेवण्याइतकी स्त्री धीट झाली. परंतु हळूहळू नोकरी करण्याच्या निमित्ताने घराबाहेर पडलेल्या व घराची आणि बाहेरची अशा दोन्ही आघाड्या एकाच वेळी सांभाळणा-या स्त्रीच्या मनाची होणारी ओढाताण, बाहेरच्या व्यापामुळे तिच्या आयुष्याला मिळणारे वेगळे रूप, त्यातून तिच्या मनावर होणारा परिणाम, त्यातून तिच्या मनात उठणारी वादळे, तसेच काही खास स्त्री जीवनाची विशिष्ट अंगे अशा या जीवनामधून निर्माण होणा-या वेगवेगळ्या समस्या उर्मिला पवार यांनी अधिक समर्थपणे मांडलेल्या आहेत.

९) एकूण मराठी कथा साहित्याचा विचार करता स्त्री आणि दलित स्त्रीच्या वेदनेचा विचार होताना दिसत नाही. दलित साहित्यातील स्त्री ही आई, पत्नी, बहीण या नात्याने आपल्या समोर येते तेव्हा ती कुटुंबासाठी, मुलांसाठी, किती खस्ता काढते, किती झिजते, सोसते याचेच चित्रण येते. पण तिलाही भावभावना आहेत. तिही एक माणूस आहे. तिलाही पुरुषाप्रमाणे मन आहे. त्यादृष्टीने तिला काय वाटते याचे चित्रण दलित साहित्यात नही. तर अशा स्त्रीचं चित्रण उर्मिला पवारांच्या कथेत दिसतं. हे त्यांच्या कथेच वेगळंपण आपल्याला पहायला मिळतं.

स्त्रीच आणि दलित स्त्रीच चित्रण आजवरच्या साहित्यातून आलेले असले तरी उर्मिला पवारांनी रेखाटलेली स्त्री, तिचा संताप, यातना, संघर्ष, अधिक ज्वलंत आहे. उर्मिला पवार या स्वतत्र दलित समाजातील असल्याने त्यांच्या कथेत दलित स्त्रीचं चित्रण अपरिहार्यपणे

आले आहेच, परंतु स्त्री ही सुध्दा एक कनिष्ठ जात मानली गेल्याने कोणत्याही स्त्रीची त्यामुळे होणा-या कोंडमा-यातून, मानहानीतून सुटका नाही याची जाण उर्मिलाबाईंना असावी. त्यामुळे त्यांच्या कथेत दलितेतर स्त्री ही चित्रित झाली आहे.

१०) उर्मिला पवारांच्या कथा वाङ्.मयाचा अभ्यास केल्यानंतर सूचकता, सहजता, संयमित अविष्कार, प्रादेशिक भाषेचा वापर, स्वभवदर्शन क्षमता हे त्यांच्या लेखनशैलीचे काही विशेष जाण्वतात. तसेच जाणिवपूर्वक परिणाम पाहायला मिळते. म्हणूनच त्यांच्या कथेची भलावण अरविंद गोखले, गंगाधर नेर्लेकर, सुशिलकुमार शिंदे, अरुण साधू अशा ज्येष्ठ समीक्षकांनी केली आहे.

अशाप्रकारे स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये समर्थपणे कथालेखन करणा-या विजया राजाध्यक्ष, कमल देसाई, सानिया, वसुधा पाटील, वसुंधरा पटवर्धन, मेघना पेठे, नीलम माणगावे यांच्या बरोबर उर्मिला पवार यांच्या नावाचा आवर्जून समावेश करावा लागतो. उर्मिला पवार यांच्या कथा प्रगल्भ जीवनदृष्टी आणि स्त्रीवादी दृष्टिकोन ठेऊन लिहिलेल्या दिसून येतात. विशेषत: महानगरीय जीवनात नोकरी करुन जगणा-या स्त्रियाचं भावविश्व त्यांची मानसिकता, त्यांचे विवाहसंस्थेशी आणि कुटुंबाशी असलेले नात आणि यातून त्यांच्या जीवनात निर्माण होणा-या समस्या यांचा वेध घेताना स्त्रीच माणूस म्हणून चित्रण करताना तिच माणूस म्हणून असणं आणि होणं तिचा भूतकाळ आणि वर्तमानकाळ, एक आणि दुसरा याच्याशी तिचं कधी कधी तुटत जाणं आणि जोडलं हे स्त्री म्हणून तिच अनुभवविश्व कसदारपणे कथांतून चित्रित केलेले दिसते. परंतु महानगरीय

स्त्रीच्या एकाकी जीवन जगण्याच्या कल्पनेतून निर्माण होणा-या समस्या याचा वेध घेण्यात त्यांच्या कथेला मर्यादा पडतात. असे असले तरी उर्मिला पवार यांच्या कथा वाचकांचं लक्ष वेधून घेणा-या ठरतात.

-----